ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 178

वर्ष २८ | पुणे, बुधवार, ५ जुलै, १९७२ | अंक ११





## धर्मप्रसारासाठी आकाशवाणीचा उपयोग
### इलेक्ट्रॉनिक मिशनरी

आफ्रिका खंडामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे, ह्याचाच अर्थ रेडिओद्वारा वार्तेबरोबर 'सुवार्ता' सांगण्यात येत आहे. एथिओपियाची राजधानी आदिस अबाबा येथे 'रेडिओ व्हॉइस ऑफ दि गॉस्पेल' हे रेडिओ केंद्र उभारण्यात आले आहे. त्याचा आवाज आफ्रिका, मध्यपूर्व येथेच नव्हे तर अतिपूर्वेकडील देशांतही ऐकता येईल. म्हणजे, सुमारे १०० कोटी श्रोत्यांपर्यंत तो संदेश पोचू शकेल. ल्यूथर्न वर्ल्ड फेडरेशनने ह्या केंद्राच्या उभारणीचा खर्च केला आहे. एथिओपिया हे आफ्रिकेतील सर्वांत जुने ख्रिस्ती राष्ट्र असल्यामुळे त्या देशात केंद्र उभारण्यास राजे हेल सलेशी ह्यांचा हार्दिक पाठिंबा मिळाला आणि आदिस अबाबाची समुद्रसपाटीपासून उंची ८,००० फूट असल्यामुळे हे ध्वनिक्षेपणास फारच सोईचे ठिकाण आहे. 'रेडिओ व्हॉईस ऑफ दि गॉस्पेल' फक्त ३०% वेळ धर्मप्रसारासाठी खर्च करतो; बाकीचा वेळ बातम्यांच्या ध्वनिक्षेपणासाठी दिला जातो. दिवसातून वीस वेळा इंग्रजी, फ्रेंच, अम्हॅरिक, हिंदी, स्वाहिली, हाऊसा आणि फुलानी ह्या भाषांतून बातम्या सांगितल्या जातात. त्यामुळे, सुशिक्षित लोक, शिक्षक, व्यावसायिक लोक, लष्करातील सैनिक, ह्यांत हे केंद्र लोकप्रिय आहे. केंद्राचा एक अधिकारी जरा आढ्यतेने म्हणाला, "आज सेंट पॉल हयात असता, तर त्याने सबंध आयुष्यात एकूण जेवढ्या लोकांना सुवार्ता सांगितली असेल, तेवढ्यापेक्षा जास्त लोकांना ह्या केंद्रावरून तो एका तासात सांगू शकला असता."

ख्रिस्ती धर्माच्या वेगवेगळ्या पंथांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य होण्यास ह्या रेडिओवरील प्रचार उपयुक्त ठरेल, त्याचप्रमाणे टेलिव्हिजनचाही त्यासाठी वापर करण्यात येऊ लागेल.

---

## मुंबई-पुणे तेलवाहतुकीसाठी पाइप लाईन

बोरघाटातून अधिक मालाची वाहतूक रेल्वेला कशी करता येईल, ह्याविषयी विचार करण्याकरिता नेमलेल्या अभ्यासगटाने ट्रॉम्बे तेलशुद्धी कारखान्यापासून पुण्यापर्यंत तेलवाहतुकीसाठी नळ टाकण्याची शिफारस केली आहे. घाटातून होणाऱ्या रेल्वे-वाहतुकीत तेलाच्या टँक वॅगन्सचा भरणा खूप मोठा असतो. आगगाडीने तेल नेण्यापेक्षा नळातून ते पाठविणे ४०% स्वस्त पडेल. ह्या नळाच्या योजनेस १०·५ कोटी रु. खर्च येईल व त्यावर १४% व्याज सुटेल अशी अपेक्षा आहे. मुंबई ते मनमाड नळ टाकण्याचीही सूचना करण्यात आली आहे, तिला खर्च १२·७५ कोटी रु. येईल. तेलाच्या नळातून तेलाची वाहतूक रेल्वेनेच करावयाची आहे.

---

## राष्ट्रीयीकृत बँकांवर दरोडे व फसवणूक

राष्ट्रीयीकृत बँकांवर पडलेल्या दरोड्यात आणि बँकांच्या केलेल्या फसवणुकीत १९ सप्टेंबर १९६९ ते ३१ मे १९७१ ह्या मुदतीत वेगवेगळ्या बँकांचे झालेले नुकसान खालील आकडे दर्शवितात :—

| बँक | दरोडे (रु.) | फसवणूक (रु.) |
|---|---|---|
| सेंट्रल बँक | १,४८,४२२ | ५८,३३,४८० |
| बँक ऑफ इंडिया | २,८५,००० | १०,४०,५०५ |
| पंजाब नॅशनल बँक | २९,१२० | ६,९१,५७२ |
| बँक ऑफ बरोडा | — | २,००,५३६ |
| युनायटेड कमर्शिअल बँक | १,०७,००० | १,९२,७२८ |
| कॅनरा बँक | — | — |
| युनायटेड बँक ऑफ इंडिया | — | ४२,००० |
| देना बँक | १२,९०० | १०,३५६ |
| सिंडिकेट बँक | — | ९९,५७७ |
| युनियन बँक | — | ३३,४३,७७७ |
| अलाहाबाद बँक | २१,४०० | १२,५६६ |
| इंडियन बँक | — | १,६८,००० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | — | १६,३५९ |
| इंडियन ओव्हरसीज बँक | — | ४७,९१६ |
| | ६,०३,८४२ | १,१६,९९,३७२ |

---

## स्कूटर्स आणि मोटारसायकलीचे उत्पादन

| स्कूटर्स | १९७० | १९७१ |
|---|---|---|
| व्हेस्पा (बजाज) | ३२,०९१ | ३९,७९८ |
| लॅम्ब्रेटा | २५,३३५ | २४,५०४ |
| राजदूत | ७६७ | २,८६० |
| **मोटार सायकली** | **१९७०** | **१९७१** |
| राजदूत (१७५ सीसी) | १६,५०० | १२,८०६ |
| जावा (२५० सीसी) | १६,२५३ | १५,२८३ |
| जावा (६० सीसी) | १,६६५ | ७३७ |
| रॉयल (३५० सीसी) | ७,८९० | ८,७८९ |
| एनफील्ड (१७५ सीसी) | २,३१५ | २,११५ |

---

## लॉटरींची लोकप्रियता मावळत चालली

वेगवेगळ्या राज्यांच्या लॉटरींची लोकप्रियता मावळत चालली आहे. महाराष्ट्र सरकारने लॉटरीच्या योजनेत वेळोवेळी सुधारणा केल्यामुळे इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्यातील लॉटऱ्या अधिक सातत्याने सरकारला पैसा देत आहेत. (पहिल्या वर्षी ५·६१ कोटी रु., दुसऱ्या वर्षी २·९२ कोटी रु., तिसऱ्या वर्षी ३ कोटी रु.) पहिल्या वर्षी बक्षिसांची संख्या १४,००० होती; आता ती ३२,००० करण्यात आली आहे. मुख्य आणि मध्यावधी लॉटऱ्यांत प्रत्येकी २३·१० लक्ष रु. ची बक्षिसे असतात.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ जुलै, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे



*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*


## चलनवाढीविरुद्ध लढा

### सरकारप्रमाणे कारखानदारांचीही काही कर्तव्ये आहेत !

**हिंदुस्तान लिव्हरचे चेअरमन, श्री. व्ही. जी. राजाध्यक्ष ह्यांचे उद्‌बोधक भाषण**

कंपन्यांच्या वार्षिक सभेच्या वेळी त्यांचे चेअरमन भाषणे करतात, त्यात संबंधित कंपन्यांच्या आर्थिक परिस्थितीचे विवरण केलेले असते; त्याचप्रमाणे देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक परिस्थितीचाही आढावा घेतलेला असतो. कारण, कंपनीचे भवितव्य व्यापक अर्थकारणावर अवलंबून असते. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे संस्थापक-चेअरमन कै. प्रा. वा. गो. काळे ह्यांची अशी भाषणे ऐकण्यासाठी बँकेचे भागीदार सभेत बहुसंख्येने उपस्थित होत असत आणि त्यांच्या ज्ञानात बहुमोल भर पडत असे; त्यांच्या शंकांचे निवारण होत असे. हिंदुस्तान लिव्हर लि. ची वार्षिक साधारण सभा गेल्या महिन्यात झाली, त्या वेळी तिचे चेअरमन श्री. व्ही. जी. राजाध्यक्ष ह्यांनी केलेले भाषण अशा प्रकारच्या ह्या वर्षातील सर्व भाषणांत उत्कृष्ट ठरेल. "चलनवाढीचा कंपन्यांवर, त्यांच्या भागधारकांवर, सेवकवर्गावर आणि गिऱ्हाइकांवर होणारा प्रतिकूल परिणाम आणि त्याची तीव्रता कमी करण्याचे कारखानदारांनी करावयाचे उपाय" हा त्यांच्या भाषणाचा मुख्य विषय होता.

"गरिबीच्या उच्चाटनाचे युद्ध जिंकण्यासाठी बेकारी, दुष्काळ, महापूर, लोकसंख्यावाढ, चलनवाढ, इत्यादी कितीतरी शत्रूं-विरुद्ध लढाया जिंकायला हव्यात; चलनवाढीविरुद्ध द्यावयाच्या लढ्याशी कारखानदारांचा विशेष संबंध येतो. विकसित आणि विकसनशील, सर्वच राष्ट्रांना चलनवाढ रोखण्यात कमी-जास्त अपयश आले आहे. भारताला गेल्या वीस वर्षांत तीन युद्धे आणि दोन दुष्काळ ह्यांना तोंड द्यावे लागले ह्याचा विचार करता, त्याने चलनवाढ बाजवी मर्यादेत राखण्यात यश मिळविले आहे. दरसाल ५% चलनवाढीची आपण ह्यापुढे मानसिक तयारी ठेवायलाच हवी. ५% च्या पुढे ती जाऊ न देण्यासाठी सर्वांना फार मोठी लढाई द्यावी लागणार आहे.

"कमी उत्पन्नाच्या बहुसंख्य लोकांवर चलनवाढीचे आणि महागाईचे सर्वप्रथम दुष्परिणाम होतात. लोकशाहीवर आधारलेले सरकार साहजिकच लोकक्षोभ टाळण्यासाठी तात्कालिक परिणाम करणाऱ्या, किमतींच्या नियंत्रणाचा अवलंब करते, ह्यात नवल नाही. किमतींवर फाजील नियंत्रणे घातली गेली तर ती उत्पादनाच्या यंत्रणेला घातक ठरतात—मग ती कारखानदारी असो वा शेती असो. तात्कालिक उपायामुळे मालाचा तुटवडा तीव्रतर होऊन चलनवाढीस प्रोत्साहन मिळते, असा अनुभव येतो. कंपन्यांच्या आरोग्यावर चलनवाढीचे आणि किमतींच्या नियंत्रणाचे खरोखर परिणाम काय होतात, ह्याकडे दुर्लक्ष व्हावे ही खेदाची गोष्ट आहे. ह्याबाबतीत प्रायव्हेट सेक्टर आणि पब्लिक सेक्टर असा भेद राहात नाही; दोघांनाही ही बाब महत्त्वाची आहे; कारण दोन्ही सेक्टरकडील पैसा जनतेची बचत आणि करवसुली ह्यांमधूनच गोळा झालेला असतो."

श्री. राजाध्यक्ष ह्यांनी स्वतःच्या कंपनीच्या १९६१ ते १९७१ च्या आकड्यांची अर्थशास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनातून छाननी करुन दाखविले की, चलनवाढ विचारात घेताही उलाढालीत ४५% वाढ झाली असली तरी नफ्याचे मूल्य ह्याच काळात १९६१ शी तुलना करता, ३३% ने घटले आहे ! चलनवाढीला अनुसरून हिशेबपत्रके तयार करण्यात येत नाहीत, ही त्रुटीही त्यांनी स्पष्ट करून दाखविली. ते पुढे म्हणाले, "फिक्स्ड ॲसेटसच्या मूळ पडलेल्या किमतीवरच घसारा काढला जातो; त्यापेक्षा जास्त घसारा इनकम टॅक्स कायदा मान्य करीत नाही. परंतु, जुन्या ॲसेटच्या जागी नवीन ॲसेटस घेण्यास हा घसारा पुरा पडत नाही. खेळत्या भांडवलावर चलनवाढीच्या होणाऱ्या परिणामाकडेही लक्ष दिले जात नाही. भागधारकांनी पुरविलेल्या भांडवलावरच बव्हंशी अवलंबून राहावयाचे असेल, तर कंपनीची 'रिअल वर्थ' राखण्यासाठी जास्त नफा कंपनीतच मुरविला गेला पाहिजे. १९७१ साली हिंदुस्तान लिव्हरला पारंपरिक हिशेबपद्धतीने ७·५९ कोटी रु. करपूर्व नफा झाला; चलनवाढ हिशेबात घेतली तर तो २ कोटी रुपयांनी कमी भरेल. सर्वच कंपन्यांची अशीच कमीअधिक परिस्थिती आहे; आम्ही चलन-वाढीच्या परिणामांची जाणीव बाळगतो आणि व्यवस्था खर्चाच्या हिशेबात तिला स्थान देतो. कंपन्या आपल्या प्रसिद्ध होणाऱ्या हिशेबात ही वस्तुस्थिती का दर्शवीत नाहीत आणि 'रिअल वर्थ' खाऊन टाकणाऱ्या चलनवाढीच्या दुष्परिणामाची तरतूद का करीत नाहीत, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याला उत्तर म्हणजे ऑडिटर्स चलनवाढीची दखल घेण्यास आणि त्याची तरतूद कशी करावी इकडे लक्ष देण्यास तयार होण्यासच कित्येक वर्षे लागतील. कराच्या दृष्टीने 'रिअल वर्थ' काढण्यासाठी

चलनवाढीच्या तरतुदीस कायद्याची मान्यता मिळण्यास त्याहीपुढे काही वर्षे लागतील. भागभांडवल वाढविण्याऐवजी कर्जे आणि ठेवी ह्यांचा वाढत्या प्रमाणावर उपयोग करून नफ्याचे प्रमाण वाढवून हुशार लोकांना हिशेबाची पद्धती न बदलता चलनवाढीचे दुष्परिणाम पूर्वी टाळता येत असत. आता, विशेषतः उपभोग्य जिनसांच्या उत्पादकांच्या बाबतीत, सरकार किमती आणि त्यामुळे नफ्याचे प्रमाण निश्चित करते इतकेच नव्हे तर बँकिंगवरील स्वतःच्या नियंत्रण-अधिकारामुळे फर्म्सनी किती कर्जे घ्यावी, ह्यावरही नियंत्रणे ठेवते. किमतीवर नियंत्रणे ग्रेटब्रिटनमध्ये आणि अमेरिकेतही आहेत; केवळ भारतातच आहेत असे नाही, हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. किमतीवरील नियंत्रणाचे काही परिणाम उपकारक झाले आहेत. त्यामुळे स्वतःच्या अकार्यक्षमतेचा गिऱ्हाइकांवर बोजा टाकणे फर्म्सना अवघड केले आहे. भारतासारख्या सुरक्षित आणि नियोजित अर्थव्यवस्थेत किमतीवरील नियंत्रणे कार्यक्षमतेला पोषकच ठरतात. पण हा केवळ अल्पकालीन उपाय व परिणाम होय.

"चलनवाढीच्या काळात जीवनावश्यक जिनसांच्या किमती वाढल्या म्हणजेच आवश्यक तो पैसा उपलब्ध होऊन औद्योगिक यंत्रणा काम करीत राहू शकते. किमतीवरील नियंत्रणे ठराविक मर्यादेबाहेर गेली, म्हणजे मात्र धंद्यात जास्त भांडवल गुंतविणे समर्थनीय ठरत नाही. पैसे गुंतविणारे लोक जास्त लाभदायक ठिकाणी आपला पैसा वळवितात; ते उद्योग महत्त्वाचे असोत वा नसोत. उत्पादनवाढीस भांडवलाचा तुटवडा जाणवू लागतो; आवश्यक जिनसांची उत्पादनवाढ मंदावून तुटवडा होऊ लागतो. औद्योगिक उत्पादनाच्या कार्यक्षमतेत दूरगामी सुधारणा करण्यासाठी लागणारा आवश्यक तो पैसा मिळत नाही. वास्तविक, औद्योगिक कार्यक्षमतेत दूरगामी वाढ हाच चलनवाढीवरील प्रभावी उपाय आहे. संशोधन आणि विकास ह्यात भरपूर गुंतवणूक केली तरच जुन्यापुराण्या उत्पादनपद्धती आणि कमवर्जाच्या मालाची निष्पत्ती ह्यातून राष्ट्र ह्या दृष्टीने आपली सुटका होईल.

"आवश्यक जिनसांचे रेशनिंग आणि इतर मार्गे शहरी लोकांचे काही प्रमाणात चलनवाढीपासून संरक्षण करता येते, पण लहान गावे आणि खेडी येथपर्यंत हा उपाय पोचू शकत नाही. सरकार आणि कारखानदार ह्यांनी कसून प्रयत्न केला, तरी वाटप समप्रमाणात करता येणे अशक्य ठरते. त्यामुळे होणाऱ्या अन्यायावर एकच उपाय म्हणजे उत्पादनवाढ.

"उत्पादनवाढीच्या अभावी रोजगार निर्माण होण्याची क्षमता न वाढल्यामुळे आणि सरकारच्या उत्पन्नातही भर न पडल्यामुळे सरकार आणि जनता ह्या दोघांनाही चलनवाढीचे दुष्परिणाम तीव्रतेने भोगावे लागतात. त्याचबरोबर, कारखानदारांपैकी जे समाजद्रोही, करचुकवे आहेत त्यांचे फावते; त्यांची भरभराट होऊ लागते. हिंदुस्तान लिव्हरने १९७१ मध्ये कर देऊन ३ कोटी रु. नफा मिळविला, पण तो मिळवीत असताना त्या कंपनीने सरकारला एक्साइज ड्यूटी, कॉर्पोरेट टॅक्स, सेल्स टॅक्स, कापून घेतलेला इनकम टॅक्स, इत्यादींच्या द्वारा २२ कोटी रु. जमवून दिले. करचुकवे कारखानदार सरकारचे देणे बुडवितात, त्यामुळे राष्ट्रीय उद्दिष्टांस, शाळांसाठी, इस्पितळांसाठी, घरबांधणीसाठी, सार्वजनिक वाहतुकीसाठी, दळणवळणासाठी, वीज-पाणी पुरवठ्यासाठी, ड्रेनेजसाठी तेवढे पैसे कमी पडतात. समाधानकारक कार्यक्षमतेवर आधारलेल्या वस्तुनिष्ठ किमतीची पब्लिक सेक्टरलाही आवश्यकता आहे.

"चलनवाढ आणि भाववाढ ह्या महत्त्वाच्या आर्थिक समस्या आहेत आणि त्या सोडविण्याची जबाबदारी कोणावर आहे? सर्वप्रथम सरकारवर; कारण चलनविषयक आणि अर्थविषयक धोरण तेच आखते. येथे विचार मुख्यतः केला आहे तो किमतीच्या नियंत्रणाचा आणि लायसेन्सविषयक धोरणाचा. कंपन्यांना उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त उत्पादक उपयोग करता यावा, अशी ती धोरणे हवीत. लायसेन्सिंग धोरण हे उत्पादनवाढीच्या दृष्टीनेच आखण्यात यावे. चलनवाढ ही आपण सोडविण्याची समस्या नाही, असे कारखानदारांनी मानता कामा नये; सरकारवर टीका करून स्तब्ध बसता कामा नये. खर्चातील वाढ शक्य तो रोखून धरणे आणि किंमतवाढ टाळणे हे सर्व कारखानदारांचे कर्तव्य आहे" श्री. राजाध्यक्ष ह्यांनी आपल्या भाषणात हिंदुस्थान लिव्हर हे कर्तव्य कसे पार पाडीत आहे, हे तपशीलवार वर्णन करून सांगितले; तो सर्व तपशील आत्ताच येथे दिलेला नाही. परंतु तो सर्व कारखानदारांनी काळजीपूर्वक अभ्यासण्याजोगा आहे.

"ओव्हरहेड्सचा बोजा विभागून वाटता येण्यासाठी आणि तुटवडे भरून काढण्यासाठी विस्तार आवश्यक आहे; चांगले व्यवस्थापक आकर्षून ते राखता आले पाहिजेत; उत्पादकता सुधारल्याबद्दल कामगारांचे वेतन वाढविता आले पाहिजे; उद्योगाच्या सर्व क्षेत्रांबाबत संशोधन आणि सुधारणा करता यायला हव्यात; भागधारकांना पुरेसा मोबदला देता आला पाहिजे; त्याखेरीज चलनवाढीविरुद्ध वापरण्याची शस्त्रे बोथटच राहणार. तथापि, आज उभी असलेली परिस्थिती चिंताजनक असली, तरी भागधारकांना योग्य मोबदला देणे आणि चलनवाढ रोखणे ह्यात समतोल साधण्यात आपण यशस्वी होऊ असा श्री. राजाध्यक्षांनी आपल्या भाषणाचा शेवट केला आहे.

---

**ब्रिटॅनिया बिस्किट्स—** ३१ मार्च, १९७२ असेर संपलेल्या वर्षी ह्या कंपनीने १९·८२ कोटी रु. ची विक्री करून २·१८ कोटी रु. ठोक नफा मिळविला. १६% डिव्हिडंड कायम आहे. उत्पादनखर्च वाढला तरी कंपनीने गेल्या वर्षी बिस्किटांची किंमत वाढविली नाही.

# स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स् लि., खडकी, पुणे ३

## चेअरमन, श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचे अध्यक्षीय भाषण

[ स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. ची २४ वी वार्षिक साधारण सभा गुरुवार, दि. २९ जून, १९७२ रोजी कंपनीच्या रजिस्टर्ड कचेरीत, खडकी, पुणे ३ येथे भरली होती. त्यावेळी चेअरमन, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, यांनी केलेले निवेदन. ]

सभासद बंधु-भगिनींनो,

आपल्या कंपनीच्या या २४ व्या वार्षिक साधारण सभेस आपणा सर्वांचे अगत्यपूर्वक स्वागत करण्यास मला विशेष आनंद वाटत आहे.

३१ डिसेंबर, १९७१ अखेरीचा संचालक मंडळाचा अहवाल आणि हिशोबाची पत्रके ही आपणांस मिळून बराच अवधी झालेला आहे, तेव्हा ती येथे सर्व वाचलेली आहेत असे मी आपल्या परवानगीने गृहीत धरतो. अहवालाच्या वर्षातील कंपनीचे काम बरेच समाधानकारक झाले आहे, हे पाहून आपणांस आनंद झालाच असेल. विक्रीचा आकडा गेल्या वर्षी ६·०४ कोटी रु. होता तो १९७१ मध्ये ७·३७ कोटी रु. झाला. ३५·२१ लक्ष रु. ची घसाऱ्यासाठी तरतूद करून करपूर्व नफा २४·३१ लक्ष रु. झाला. गेल्या वर्षी तो २२·१८ लक्ष रुपये होता.



श्री. शंतनुराव किर्लोस्कर

अविवटी भागावरील डिव्हिडंडचा दर १२ टक्के हा कायम ठेवावा, अशी संचालक मंडळाची शिफारस आहे. संरक्षणविषयक गरजांना प्राधान्य द्यावे लागल्याकारणाने आपली कंपनी निर्गतीचे लक्ष गाठू शकली नाही. संरक्षण आणि सरकारी इतर खाती यांचेकडून वाढत्या प्रमाणावर मागण्या आल्यामुळे कंपनीच्या उलाढालीत बरीच वाढ झाली. अहवालाच्या वर्षी कंपनीचे संरक्षणविषयक उत्पादन तिपटीपेक्षा अधिक झाले. संरक्षण खात्याच्या कंत्राटांना मालाच्या किमती सांगताना आम्ही फारच थोडे नफ्याचे प्रमाण ठेवले होते, पण कच्च्या मालाच्या किमतीमधील वाढीमुळे ते प्रमाणही साध्य होऊ शकले नाही. त्यामुळे कंपनीच्या किफायतशीरपणावर बराच प्रतिकूल परिणाम झाला. आपल्या कंपनीच्या निर्गतीमधील वाढीच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजे सरकारी धोरणातील एकसूत्रतेचा अभाव. कारखानदार आणि सरकार यांचेमध्ये उत्पादन आणि निर्गत यांना पोषक अशा वाढत्या एकवाक्यतेची गरज आहे असे मला वाटते. निर्गतीला चालना देण्यासाठी कारभाराच्या पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने आणि रबर उद्योगाच्या दीर्घकालीन प्रश्नांची उकल करण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत. गेल्या तीन-चार वर्षातील माझ्या भाषणातून मी त्यांचा अनेकवार उल्लेख केलेला आहे.

उत्पादनाची प्रत्यक्ष किंमत तरी आम्हांस मिळावी ह्या दृष्टीने सरकारने आवश्यक ते उपाय योजले नाहीत, तर आम्हांस आमची निर्गत खूपच कमी करावी लागेल. प्रॉयॉरिटि लिस्टवर राहण्यासाठी आणि मशिनरीसाठी आयात परवाने मिळविण्यासाठी कबूल केलेली आवश्यक तेवढीच निर्गत करणे आम्हांस भाग पडेल.

मॉरीशसमधील इंडो. जर्मन मॉरिशिअन इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि., ह्या आपल्या कंपनीच्या सह-उपक्रमाचा कारखाना उभारणीचे काम पुरे झाले असून २० जून १९७२ पासून त्यात उत्पादनही सुरू झाले आहे, हे येथे नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे. आपली कंपनी केवळ तांत्रिक सल्लाच पुरवीत नसून, त्यासाठी आम्ही तंत्रज्ञ येथून पाठविले आहेत व प्रत्यक्ष कारभारातही ती भाग घेत आहे.

१९७१ मधील आणखी एक विशेष घटना म्हणजे दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे आपल्या कंपनीमध्ये झालेले विलिनीकरण. ३१ डिसेंबर १९७१, रोजी ह्या विलिनीकरणाचे शिक्कामोर्तब होऊन ते अमलात आले. त्यामुळे आपल्या कंपनीत सुमारे ९,००० भागधारक दाखल झाले आहेत. ह्या भागधारकांचे मी स्वस्तिकमध्ये स्वागत करतो आणि कंपनीला उपलब्ध झालेल्या नवीन भांडवलाचा विनियोग आधीच हाती असलेल्या विकास योजनांसाठी केला जाईल असे त्यांना खात्रीपूर्वक सांगतो. या भांडवलामुळे कंपनीच्या वाढीस आणि किफायतशीरपणास मदत होईल.

नाशिक येथील पी. व्ही. सी. पादत्राणाचा विभाग गेल्या नोव्हेंबर-पासून चिंचवडच्या कारखान्यात हलविण्यात आला आहे. नाशिक येथे सर्व प्रकारच्या दळणवळणाच्या सोईचा अभाव अनुभवास

आल्यामुळे हे स्थलांतर आवश्यक झाले. आम्हांला नाशिक येथे विभाग उभारून एक वर्ष होईपर्यंतसुद्धा साधा टेलिफोन किंवा टेलिप्रिंटर ह्यांची सोय होऊ शकली नाही. नाशिकहून माल पाठविण्यासाठी रेल्वेच्या वाघिणी मिळणे दुष्कर झाले. वाहतुकीसाठी कित्येक प्रसंगी ट्रक्ससुद्धा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत, कारण नाशिकहून उत्तर हिंदुस्तानाकडेच ट्रक्सची वाहतूक फारच थोडी होते. बहुतेक ट्रक्स मुंबईलाच भरल्या जातात आणि आम्ही मुंबई ते दिल्ली भाडे भरले तरच नाशिकला माल चढविण्यास ट्रक्स मिळू शकत असत. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे तयार माल साठून राहू लागला, त्यामुळे सिकॉमने देऊ केलेल्या सर्व आर्थिक सवलतींचा अपेक्षित फायदा घेता आला नाही.

गेल्या वर्षी हिंदी रबर उद्योगाने सर्वसाधारणपणे स्वयंपूर्णता गाठली आहे आणि त्याने बरीच प्रगती केली आहे. जकातीचा भरमसाट दर, महत्त्वाच्या काही कच्च्या मालाची दुर्मिळता आणि महर्गता अद्यापही या उद्योगापुढे आहेत. सॉल्व्हंटच्या जकातीमध्ये १४० टक्के झालेल्या वाढीने रबर उद्योगाला चांगलाच धक्का दिला आहे. ती जकात पुढे ४५० टक्क्यांवर आली. त्या वाढीमुळे सामान्य नागरिक व शेतकरीवर्ग ह्यांच्या नित्याच्या उपयोगाच्या काही प्रकारच्या जिनसांच्या उत्पादनखर्चावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. या उद्योगाला तोंड द्यावे लागणाऱ्या ह्या आणि इतर कित्येक प्रश्नांकडे अधिक मोकळ्या मनाने लक्ष देण्यास मी सरकारला आवर्जून सांगू इच्छितो.

चालू वर्षाच्या नोव्हेंबरमध्ये आपल्या कंपनीच्या राष्ट्रीय क्षेत्र सेवेस २५ वर्षे पुरी होत आहेत, हे अत्यंत समाधानपूर्वक व्यक्त करण्याची मी ही संधी घेतो. १९४७ साली म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्यवर्षी कंपनीची स्थापना झाली. राष्ट्राच्या सर्वव्यापी विकासाला भक्कम औद्योगिक पाया घालण्याचे काम कंपनीने द्रष्टेपणाने केले आणि तेव्हापासून राष्ट्र मजबूत करण्याच्या प्रयत्नात विशेषतः संरक्षणक्षम करण्याच्या प्रयत्नात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. भारताच्या आर्थिक उद्धाराला वाहून घेतलेल्या आपल्या कंपनीची सालोसाल वाढ होत जाऊन ती आता ह्या प्रदेशातील एक महत्त्वपूर्ण औद्योगिक संघटना बनली आहे.

कंपनीचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स, श्री. व्ही. एस्. वैद्य आणि श्री. जी. एस्. वैद्य, ह्यांनी कंपनीप्रीत्यर्थ बजावलेल्या मौलिक कामगिरीबद्दल मी व्यक्त करीत असलेल्या भावनांशी आपण सहभागी व्हाल ह्याची मला पूर्ण खात्री आहे. त्यांच्या तज्ज्ञ आणि कुशल मार्गदर्शनाखाली कंपनीने स्वतःच्या गिऱ्हाइकांत आणि गुंतवणूक करणाऱ्या जनतेत उत्कृष्ट लौकिक कमविला आहे.

कंपनीच्या प्रगतीस स्वतःच्या मेहनतीने आणि कर्तव्यनिष्ठेने हातभार लावल्याबद्दल प्रत्येक कर्मचाऱ्याला मी माझ्या वतीने आणि संचालकांच्या वतीने धन्यवाद देतो. पुढील काळातही त्यांनी अशीच शर्थ दाखवावी असे मी त्यांना आवाहन करतो. आपल्या कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि आत्मीयता, हे आपले खरे बळ आहे.

आपण सारे भागधारक, त्याचप्रमाणे ठेवीदार आणि बहुमोल गिऱ्हाईक ह्यांनी माझ्यावर आणि संचालक मंडळातील माझ्या सहकाऱ्यांवर जो विश्वास ठेवला आणि सतत आपुलकी आणि सहकार्य दिले त्याबद्दल मी आपणा सर्वांस मनःपूर्वक धन्यवाद देतो.

मी आपले पुनः एकवार आभार मानतो.

**सूचना :** वार्षिक साधारण सभेच्या कामकाजाच्या वृत्तांताचा हा भाग आहे, असे येथे उद्देशित नाही. (मूळ इंग्रजीवरून)

---

## 'स्वस्तिक'चे १९७१ सालचे डिव्हिडंड

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. ची वार्षिक सभा कंपनीचे चेअरमन श्री. शंतनुराव किर्लोस्कर, ह्यांचे अध्यक्षतेखाली दि. २९ जून रोजी भरली होती. त्यात संचालकांनी सुचविल्याप्रमाणे १७,९३,००५ इक्विटी भागांवर १२%, ९५,००० रिडीमेबल क्यु. प्रेफरन्स भागांवर ९% आणि २,५०,००० रिडीमेबल क्यु. प्रेफरन्स भागांवर ९.५% डिव्हिडंड देण्याचे ठरले.

"९ ऑगस्ट रोजी अथवा त्यानंतर डिव्हिडंड बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड, पुणे २ द्वारा दिले जाईल. नव्या भागांच्या कॉल्स इन ॲडवान्सवरील ३१-१२-७१ ते १०-६-७२ चे व्याज एका दिवसाच्या डिव्हिडंड बरोबरच दिले जाईल. डिबेंचर्सवरील व्याज १ जुलै रोजी दिले जाईल." असे स्वस्तिकने भागधारकांस आधीच कळविलेले आहे. (नव्या भागांवरील डिव्हिडंड डिबेंचरवरील व्याजाबरोबर दिले जाईल, असे आम्ही मागील अंकात चुकीने म्हटले होते.)

## पाकिस्तानच्या मानहानीला मद्यपान जबाबदार!

पाकिस्तानमधील एका मद्यपानविरोधी संघटनेने प्रे. भुत्तो ह्यांनी पाकिस्तानात दारूबंदी करावी अशी मागणी केली आहे. 'डॉन' ह्या वृत्तपत्रात संघटनेतर्फे एक जाहिरात पहिल्या पानावर देण्यात आली आहे. जाहिरातीत असे म्हटले आहे, "आपल्या देशाच्या झालेल्या ऐतिहासिक मानहानीला मद्यपानाचे व्यसन हेच कारण आहे. पाकिस्तानचे माजी अध्यक्ष याह्याखान हे दारूबाज आणि बेजबाबदार होते असे तुम्ही स्वतःच म्हटलेले आहे."

---

## कारखानदार भिड्यांचा पुत्र एस्. एस्. सी. त २३ वा

सांगली येथील सुप्रसिद्ध भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि. चे श्री. भालचंद्र रामचंद्र भिडे ह्यांचे पुत्र चारुचंद्र तथा श्रीकांत एस. एस. सी. बोर्डाच्या परीक्षेत ८५% गुण मिळवून त्यांनी २३ वा अनुक्रम मिळविला. हे यश भिडे कुलाप्रमाणेच महाराष्ट्रीय कारखानदारीला भूषणावह आहे.

## आर्थिक विकास आयात करता येत नाही

परदेशी व्यापार खात्याचे चिटणीस श्री. लाल ह्यांनी भारताच्या आर्थिक विकासाची पथ्ये सांगितली आहेत. पंजाब हरयाणा व दिल्ली चेंबर ऑफ कॉमर्सच्या ६७ व्या वार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. ते म्हणाले की भारताची आर्थिक प्रगती त्याच्या स्वतःच्या कार्यक्षमतेवर आणि शिस्तीवर अवलंबून आहे. त्याच बरोबर ह्या कामी देशांतर्गत साधने गोळा करण्यालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की आर्थिक विकासाची आयात होऊ शकत नाही. विकासाचे ध्येय काय असावे ह्या विषयी देशात अर्थपूर्ण मतैक्य झाले तर विकासाचे काम सोपे होणार आहे. त्यातही संघटित उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांनी आपल्यावरील जबाबदारीची विशेष जाणीव ठेवणे आवश्यक आहे. भारताने आपली निर्यात वाढवून स्वावलंबी अर्थव्यवस्था उभारली पाहिजे. चालू दशकाच्या अखेरीस हे ध्येय गाठावयाचे असेल तर भारताला निर्यात व्यापाराचे उत्पन्न दुपटीने तरी वाढवावे लागेल. उद्योगधंद्यांनी मालाचा दर्जा आणि उत्पादनाचा खर्च ह्याबद्दल काटेकोर शिस्त लावून घेतली पाहिजे. आणि निर्यात करणे हे राष्ट्रीय कर्तव्य मानले पाहिजे. आपला सर्व माल देशात खपविण्याच्या मोहास त्यांनी बळी पडता कामा नये. चेंबरने खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या सयुक्त-संघटना स्थापन करण्याची कल्पना सुचविली आहे. ती स्वागतार्ह असून कार्यक्षमतेला पोषक ठरणारी आहे.

---

## सहकारी भू-विकास बँकांची थकबाकी

भारतामधील सर्व राज्यांत कमाल जमीन धारणा कायदे करण्यात येत आहेत. महाराष्ट्रातही असा कायदा होऊ घातला आहे. शेतकऱ्यांना सहकारी बँकांमार्फत अनेक कारणांसाठी कर्जाऊ पैसा पुरविला जातो. परंतु कर्जाच्या फेडीचे चित्र मात्र आशादायक नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सहकारी भू-विकास बँकांकडून कर्जाऊ घेतलेल्या ५७·७ कोटी रुपयांची परतफेड केलेली नाही. गेल्या दोन वर्षात न फेडलेल्या कर्जाची थकबाकी विशेष वाढली आहे. कर्जाच्या परतफेडीचा तपशील असा आहे. ज्या शेतकऱ्यांकडे ६ एकरापासून १५ एकरापर्यंत जमीन आहे अशा शेतकऱ्यांकडून यावयाची थकबाकी सर्वात अधिक म्हणजे ३०·९ कोटी रुपये आहे. १५ एकरापेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांकडून १९·६ कोटी रुपये परतफेड व्हावयाची आहे. उलट ज्या शेतकऱ्यांकडे ५ एकरापेक्षा कमी जमीन आहे त्यांच्याकडून सर्वात कमी म्हणजे ७१ लाख रुपये थकबाकी यावयाची आहे. कोकणातील ठाणे, कुलाबा आणि रत्नागिरी हे जिल्हे मागासलेले आहेत. परंतु त्यांच्याकडून अवघी ७ लाख रुपयांची रक्कम येणे आहे. विदर्भाच्या आठ जिल्ह्यांपैकी ५ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांकडे २७ लाख रुपयांची थकबाकी आहे. धुळे, नाशिक, जळगाव, नगर, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद आणि अकोला ह्या अकरा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांकडून सर्वात जास्त म्हणजे ४२·५ कोटी रुपये थकबाकी येणे आहे.

## विलक्षण तीव्र उन्हाळ्याचे आर्थिक परिणाम

हिंदमधील नद्यांना येणाऱ्या पुरामुळे होणारी आर्थिक हानी आता परिचयाची झाली आहे. परंतु विलक्षण उन्हाळ्यामुळेही दूरगामी वाईट आर्थिक परिणाम होऊ शकतात ह्याचा अनुभव १९७२ मधील कडक गरमीमुळे आला आहे. विशेषतः उत्तर भारतातील उन्हाळ्याचा जबर तडाखा गेल्या ५० वर्षातील सर्वात हानिकारक ठरू पाहात आहे. लांबलेल्या ह्या उन्हाळ्यात धुळीने भरलेले गरम वारे जवळ जवळ सर्व उत्तर भारतात दिवसरात्र वाहात होते. अशा धुळीच्या गरम वाऱ्याने औद्योगिक यंत्रसामग्री आणि साधने ह्यांचे नुकसान होते. कडक उन्हाळ्याचा चटकन दिसून येणारा परिणाम म्हणजे पिण्याच्या पाण्याची टंचाई. त्याचबरोबर जलविद्युत् निर्माण करणाऱ्या जलाशयातील पाण्याची पातळीही खाली गेली आहे. त्यामुळे विद्युत्निर्मिती-गृहांना वीज निर्माण करण्यास पाणी अपुरे पडण्याची शक्यता आहे. पंजाब, हरयाना आणि दिल्ली ह्या भागांचा विजेचा पुरवठा कमी होण्याचा संभव आहे. कडक उन्हाळ्यामुळे जमीनीतील ओलावाही पार आटून गेला आहे. त्याचा परिणाम पिकांवर होणार आहे. उत्तर भारताप्रमाणेच मध्य भारतामधील कित्येक भागातही पिण्याच्या पाण्याची टंचाई आताच भासू लागली आहे. उत्तर भारतात वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांचा उगम राजस्थानात होतो. राजस्थानातील ओसाड प्रदेशात पाण्याच्या अभावी असे वारे उत्पन्न होतात. उत्तर भारतामधील सिमला, मसुरी, नैनिताल, डलहौसी ह्यांसारखी थंड हवेची ठिकाणेही सूर्याच्या दाहक तापातून सुटली नाहीत. पिण्याचे पाणी मिळणे दुरापास्त झाल्याने ह्या रम्य ठिकाणांना येणारे हौशी प्रवासीही कमी आले.

---

## कॉमनवेल्थ कंपनीला फक्त १,००० रुपये भरपाई

जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे जनरल इन्शुअरन्सचे काम करणाऱ्या ५५ भारतीय कंपन्यांना एकूण २२·५६ कोटी रु. भरपाई मिळणार आहे. सर्वात जास्त भरपाई मिळणाऱ्या कंपन्यांत न्यू इंडिया (८·२० कोटी रु.), ओरिएंटल (१·६५ कोटी रु.) ह्या कंपन्या आहेत, तर सर्वात कमी भरपाई मिळणाऱ्या कंपन्यांत व्हॅनगार्ड (८९६ रु.), कॉमनवेल्थ (१,००० रु.) ह्या कंपन्या आहेत. म्हणजे, त्यांच्या भागधारकांना काहीही भरपाई मिळू शकणार नाही, कारण त्यांचे भागभांडवल त्यांच्या तोट्यांनी संपुष्टात आणलेले आहे.

---

## उत्पन्न दडविणारे संचालक होण्यास अपात्र

ज्यांना इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी उत्पन्न दडविल्याबद्दल दंड केला आहे, अशांना कोणत्याही कंपनीचे संचालक होण्यास बंदी असावी, अशी सूचना कोईमतूर येथील सदर्न शेअर होल्डर्स फोरमने सरकारला केली आहे.

---

### डॉ. श्रीश्रीमाळ यांची आय. एफ. सी. च्या संचालकपदी निवड

नवी दिल्ली येथे १७ जून १९७२ रोजी भरलेल्या इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या विशेष सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ यांची कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळावर संबंध देशातील सहकारी बँकांचे प्रतिनिधी म्हणून निवड झाली. श्री. वसंतरावदादा पाटील यांचा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्याने व त्यांनी त्यागपत्र दिल्याने रिकाम्या झालेल्या जागी डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ यांची ही निवड करण्यात आली आहे.

सहकारी क्षेत्रात नवनवीन औद्योगिक प्रयोग-प्रकल्प सुरू करण्याच्या कामाचा डॉ. श्रीश्रीमाळ यांचा अनुभव दीन तपांचा प्रदीर्घ व प्रोत्साहक असा आहे. त्यांच्या या नव्या नेमणुकीमुळे सहकारी क्षेत्रातील नवनवीन औद्योगिक प्रयोग-प्रकल्पांना इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून आर्थिक साहाय्य मिळण्याचे काम अधिक सुलभ होईल असे वाटते.

---

### " स्टँप व रजिस्ट्रेशन ड्यूटींची सवलत रद्द करू नका " सहकारी हौसिंग सोसायट्यांचा आग्रह

स्थावर मिळकतीच्या खरेदी-विक्रीच्या दस्तांवरील रजिस्ट्रेशन फी आणि स्टँप ड्यूटी ह्यांची सहकारी सोसायट्यांना सध्या माफी आहे. ही सवलत काढून घेण्याचा सरकारचा विचार आहे. ही सवलत बंद केल्यास सहकारी हौसिंग चळवळीवर परिणाम होईल, अशी भीती बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा को. हौसिंग फेडरेशन लि. चे चेअरमन श्री. जी. जी. कामत ह्यांनी महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. मधुकरराव चौधरी ह्यांच्याजवळ व्यक्त केली आहे. सहकारी हौसिंग सोसायट्या मोकळे प्लॉट घेऊन त्यावर फ्लॅट बांधतात. ते घेणारे मुख्यत: मध्यमवर्गीय लोक असतात. सवलत बंद केली म्हणजे ह्या फ्लॅटसचे भाडे वाढून मध्यमवर्गीयांवर त्याचा बोजा पडेल. सहकारी हौसिंग सोसायट्या आपली मालमत्ता महाराष्ट्र हौसिंग फिनॅन्स सोसायटीकडे गहाण टाकून कर्ज घेतात, त्यावरही सवलतबंदीमुळे बोजा वाढेल.

---

### छोट्या शहरातून निरोधांचा खप वाढला

संतति नियमनासाठी पुरविण्यात येणाऱ्या निरोध साधनांचा खप छोट्या शहरातून वाढलेला आढळून आला. निरनिराळी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश ह्यांतून मार्च १९७२ अखेर ६.६५ कोटी साधने विकण्यात आली. त्यापैकी २.७ कोटी साधने २० हजाराच्या खाली लोकसंख्या असलेल्या आणि २० ते ५० हजार लोकसंख्या असलेल्या गावातून विकण्यात आली. गेल्या वर्षीपेक्षा ह्यावर्षी साधनांच्या खपात वाढ झालेली आहे. सर्व राज्यात पश्चिम बंगालमध्ये सर्वात अधिक म्हणजे १.२ कोटी साधने खपली. बंगाल खालोखाल उत्तर प्रदेशात १ कोटी आणि तामिळनाडूत ९० लाख साधने विकली गेली.

सहकारी सेक्रेटरींची पगारवाढ— सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींची पगारवाढीची मागणी मान्य केल्यास सहकारी संस्थांवर २.८६ कोटी रु. चा जादा बोजा बसेल असे सहकारमंत्री श्री. मोहिते ह्यांनी सांगितले.

रशियन गणक यंत्राची खरेदी —मुंबई येथील भाभा अणुसंशोधन संस्थेने रशिआकडून नवे गणक यंत्र खरेदी केले आहे. गणक यंत्रासाठी १.२० कोटी रुपये रुपयांच्या चलनात देण्यात आले. त्याचे काम येत्या डिसेंबरपासून सुरू होईल. भारतामधील हे सर्वात मोठे गणक यंत्र आहे.

दिल्लीत वृद्धवेतन योजना— दिल्लीच्या शासनाने १० लाख रुपये खर्च येणारी एक वृद्धवेतन योजना अमलात आणण्याचे ठरविले आहे. दिल्लीमध्ये कायमचे रहिवासी असणाऱ्या ६५ वर्षे वयाच्या इसमांना योजनेप्रमाणे दरमहा ४५ रुपये वृद्धवेतन देण्यात येईल.

'फिआट' च्या ऐवजी 'प्रीमिअर'— इटलीमधील फिआट कंपनीच्या लायसेन्सने दि प्रीमिअर ऑटोमोबाइल्स 'फिआट' ह्या नावाने गाड्या तयार करीत होती. ३० जून रोजी लायसेन्सच्या कराराची मुदत संपली. आता नव्या गाड्या 'प्रीमिअर' ह्या नावाने जुलैच्या मध्याचे सुमारास बाजारात येतील. गाडीच्या घडणीत बदल होणार नाही, पण चेहरा-मोहरा बदलेल.

बांगला देशातील चहाचे मळे— बांगला देशातील चहाच्या मळ्यांचे उत्पादन पुन: सुरू झाले आहे. १९७१-७२ मध्ये २.५ कोटी पौंड चहाचे उत्पादन झाले होते, ते १९७२-७३ मध्ये ५ कोटी पौंडांवर जाईल. बांगला देशात १४७ चहाचे मळे असून १,१०,००० एकर जमीन चहाच्या लागवडीखाली आहे. ह्या चहाचा दर्जा विशेष चांगला नाही; दर एकरी उत्पादनही कमी झाले.

---


बँकेतील नोकरीसाठी उपयुक्त अभ्यासक्रम

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

३६ वी बॅच १० जुलैपासून सुरू होईल

मुदत – ९ महिने ] [ वेळ – सकाळी

माध्यम – मराठी व इंग्रजी

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे २.

## भारताला मदत देणाऱ्या देशांची बैठक

भारताला आर्थिक मदत देणाऱ्या देशांची बैठक पॅरिस येथे भरली होती. ती दोन दिवस चालली. गेल्या वर्षी अवघड परिस्थितीला तोंड द्यावे लागले असतानाही भारताने उत्पादनात आणि निर्यातीत प्रगती केली ह्याची नोंद बैठकीत घेण्यात आली आणि भविष्यकाळांत मदतसंघातर्फे द्यावयाच्या मदतीबद्दल एका कार्यक्रमाला मंजुरी देण्यात आली. मदतसंघाचे मदतीचे वर्ष एप्रिलमध्ये सुरू झाले. ह्या वर्षात भारताला ५५ कोटी डॉलर्स अथवा ४०१·३ कोटी रुपये मदत विकासाच्या ठरलेल्या कामासाठी लागेल आणि कोणत्याही विकास प्रकल्पाला बांधलेली नाही अशी ७ कोटी डॉलर्स मदत द्यावी लागेल असा अंदाज करण्यात आला. ह्या मदतीत कर्जाबद्दल द्यावयाच्या सवलतीचाही समावेश आहे. बैठकीत भारताच्या आर्थिक विकासाचा आढावा घेण्यात आला आणि भावी प्रगतीची दिशा व ४थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या उरलेल्या काळात लागणाऱ्या परदेशीय मदतीचाही विचार करण्यात आला. भारतामधील शेतीच्या विकासाचा वेग समाधानकारक असल्याने अन्नधान्याची परिस्थिती भक्कम झाल्याचे स्वागत करण्यात आले. एंजिनिअरिंगच्या धंद्याने निर्यात व्यापारात आपला हिस्सा वाढविण्यात यश मिळविले आहे ही बाब विशेष उत्साहजनक समजण्यात आली. कुटुंब नियोजनाला पुन्हा जोरदार चालना दिल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. औद्योगिक उत्पादनाच्या वाढीच्या वेगाबद्दल मात्र काही सभासद-देशांनी निराशा व्यक्त केली.

---

## पी. एल. ४८० फंडांतील पैसा वदला करता येणार नाही

अमेरिकेकडून भारताला मिळणाऱ्या मालाची विक्री करून जो पैसा येतो त्याला रुपयाच्या चलनातील पी. एल. ४८० फंड म्हणतात. ह्या फंडातून इतर देशांना मदत करण्यासाठी अमेरिका पैसे घेत असे. आता भारत सरकारने ही व्यवस्था रद्द केली आहे. आशिआतील देशांतील नागरिकांना निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण देण्याचा स्थानिक खर्चही अमेरिका ह्या फंडातूनच करीत असे. तथापि भारत सरकारच्या ह्या निर्णयाचा आणि अमेरिकेकडून भारताला मिळणारी मदत बंद होण्याचा काहीही संबंध नाही. निर्णय बराच पूर्वी घेण्यात आलेला आहे. १९७०-७१ चे आर्थिक वर्ष संपल्यानंतर पी. एल. फंडातून पैसा वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आलेली नाही. ह्या फंडातील पैसे अमेरिकेच्या मालकीचे असतात ही गोष्ट खरी; पण ती भारताच्या रोख्यात गुंतविली जात असत. अर्थातच अमेरिकेला फंडातून पैसे वर्ग करण्याची सवलत दिल्याने भारताच्या अंदाजपत्रकावर परिणाम होत असे. आशियातील इतर देशांना मदत द्यावयाची असेल तर तशी ती थेट देता येईल असे सुचविण्यात आले आहे. नेपाळला मदत देण्यासाठी वरील फंडातून अमेरिका दरसाल सुमारे ७ कोटी रुपये उचलत असे. अमेरिका व भारत ह्यांच्यात चर्चा होऊन नेपाळच्या मदतीचा कार्यक्रम पी. एल. ४८० फंडाशी निगडित असू नये असे ठरविण्यात आले. भारत नेपाळला दीर्घकाळपर्यंत स्वतंत्रपणे मदत देत आहेच. अमेरिकाही असा मार्ग स्वीकारण्याची शक्यता आहे.

---

## विजेच्या उत्पादनवाढीसाठी मध्यवर्ती प्रयत्न

देशाच्या निरनिराळ्या भागांत विजेच्या उत्पादनाचा विकास व विस्तार करण्यासाठी भारत सरकार फार मोठ्या प्रमाणावर कामे करणार आहे. ह्यासंबंधी बोलताना मध्यवर्ती सरकारचा प्रवक्ता म्हणाला की ज्या भागात विजेचा अपुरा पुरवठा आहे त्या भागाची गरज भागविण्यासाठी सरकारला स्वतःच्या नियंत्रणाखाली काही वीजपुरवठा असणे आवश्यक वाटत आहे. ह्याच हेतूने पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात सुमारे ५-६ वीजनिर्मिती केंद्रे उभारण्याची सूचना करण्यात आली आहे. ही सर्व केंद्र मध्यवर्ती सरकारतर्फे उभारली जावयाची आहेत. सध्या देशाच्या निरनिराळ्या भागात उत्पादन करण्यात येणाऱ्या विजेच्या शक्तीत समतोलपणा राहिलेला नाही. काही भाग ह्या बाबतीत पुढारलेले आहेत तर काही मागासलेले आहेत. म्हणून नवीन केंद्रे उभारताना प्रादेशिक गरजांचा प्रामुख्याने विचार करण्यात येणार आहे. ज्या राज्यातून जलविद्युत् निर्माण करण्यासारखी परिस्थिती विशेष अनुकूल आहे पण विजेची गरज मात्र त्या मानाने कमी आहे अशा राज्यातूनही जलविद्युत्गृहे उभारण्याचा विचार करण्यात येणार आहे. ज्या विद्युत् विकासयोजनांच्या बाबतीत दोन अगर अधिक राज्यांचा संबंध पोचतो अशा योजना स्वतःच हाती घेण्याचा सरकारचा मानस आहे. ज्या भागातून जलविद्युत् केंद्रे उभारण्याची शक्यता नाही अगर जेथे ती आणखी उभारण्याची शक्यता नाही त्या भागात प्रचंड औष्णिक वीजउत्पादन केंद्रे स्थापन करण्याचा सरकारचा इरादा आहे. उत्पादनाबरोबरच वीज वहनाची कामेही सरकार करील.

---

## परदेशांच्या वाचनालयांना नेपाळात बंदी

परदेशांच्या आर्थिक साहाय्याने चालविण्यात येणाऱ्या वाचनालयांना नेपाळ सरकारने बंदी केली आहे. मात्र काटमांडू ह्या राजधानीच्या शहरातील वाचनालयांना हा हुकूम लागू नाही. नेपाळ सरकारने ह्या हुकमाबद्दल काही खुलासा प्रसिद्ध केलेला नाही. परंतु हुकुमाला चीनने केलेली एक विनंती कारणीभूत झाली असा प्रवाद ऐकू येतो. काटमांडूपासून पश्चिमेस ५० मैलांवरील एका ठिकाणी वाचनालय काढू देण्याची परवानगी चीनच्या नेपाळमधील वकिलातीने केली होती. नेपाळमध्ये होणाऱ्या परदेशांच्या राजकीय प्रचाराला पायबंद घालण्याचा हा प्रयत्न आहे. नेपाळच्या ह्या हुकमापुढे भारत, रशिआ व ब्रिटन ह्यांच्यातर्फे चालविण्यात येणाऱ्या केंद्रांवर परिणाम होणार आहे.

---

### भारताच्या लोकसंख्येत दहा वर्षांत ११ कोटींची वाढ

१ एप्रिल, १९७१ रोजी भारताची लोकसंख्या ५४·७९ कोटी भरली. म्हणजे, ती गेली दहा वर्षे दरसाल २·४% ह्या गतीने वाढली. लोकसंख्येपैकी २८·३९ कोटी पुरुष आणि २६·४० कोटी स्त्रिया आहेत. ग्रामीण भागाची वस्ती ४३·८८ कोटी आणि शहरी भागाची वस्ती १०·९० कोटी आहे.

५४·७९ कोटींपैकी १४·६% लोक शेड्यूल्ड कास्टचे आणि १४·६% शेड्यूल्ड ट्राइब्सचे आहेत. नऊ शहरांची लोकसंख्या प्रत्येकी १० लाखांपेक्षा जास्त आहे. (कलकत्ता ७१ लक्ष, मुंबई ५९·७ लक्ष, मद्रास ३१·६ लक्ष, हैद्राबाद १७·९ लक्ष, अहमदाबाद १७·४ लक्ष, बंगलोर १६·५ लक्ष, कानपूर १२·७ लक्ष आणि पुणे ११·३ लक्ष.)

एकूण लोकसंख्येपैकी ८२·७२% हिंदू, ११·२१% मुसलमान, २·६०% ख्रिस्ती, १·८९% शीख, ०·७०% बौद्ध आणि ०·४७% जैन आहेत.

लोकसंख्येच्या वाढीच्या गतीत ख्रिस्ती अग्रेसर आहेत. त्यांची लोकसंख्या गेल्या दहा वर्षांत ३२·६०% नी वाढली. शिखांची वाढ ३२·२८%, मुसलमानांची ३०·८५%, जैनांची २८·४८%, हिंदूंची २३·६९% आणि बौद्धांची १७·२०% ने झाली.

हे सर्व आकडे १ एप्रिल, १९७१ चे आहेत. आजची लोकसंख्या ५६ कोटी भरेल.

---

### चित्रपटगृहातील प्रमुख जाहिरातदार

५० हजार लोकवस्तीपेक्षा मोठ्या शहरातील चित्रपटगृहात दाखविण्यात येणाऱ्या जाहिरातींपैकी ७०% जाहिराती खालील २१ जाहिरातदारांच्या असतात:— अलेंबिक, अमृतांजन, बीचॅम, ब्रुक बाँड, कॅडबरी, चीजब्रो-पाँड, सीबा, कोलगेट, कोकाकोला, जिऑफ्रे मॅनर्स, ग्लॅक्सो, हॉर्लिक्स, इंडिया टोबॅको, लिव्हर्स, लिप्टन्स, निकोलस ऑफ इंडिया, रेकिट अँड कोलमन, रिचर्डसन हिंदुस्तान, स्टेट बँक, टॉमको आणि वझिर सुलतान.

---

### औषधांची विक्री मूळ नावानेच केली पाहिजे

३१ मार्च, १९७२ नंतर पाकिस्तानात विकली जाणारी औषधे शास्त्रज्ञांनी त्यांना दिलेल्या नावानेच विकण्यात आली पाहिजेत; कारखानदारांनी ठेवलेल्या नावाने नव्हे. स्वतःच्या नावाला जाहिरातींच्या द्वारा महत्त्व देऊन कारखानदार भयंकर नफा उकळतात, अशी तक्रार आहे. उदाहरणार्थ, ॲसिटेलॅसिलिक ॲसिडच्या १,००० वड्यांना १ रुपया पडतो, तर ॲस्पिरिन ह्या नावाखाली त्या वड्या ८ रुपयांना विकल्या जातात, असे पाकिस्तान सरकारचे नव्या कायद्याचे समर्थन आहे. औषधावर यापुढे शास्त्रीय नावेच फक्त छापावी लागतील.

---


## सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





# है व्यर्थ न हो बलिदान!

डिसेंबर-१९७१ मध्ये झालेल्या;
भारत-पाक युध्दात ज्या जवानांनी वीरमरण पत्करले अगर जे जवान अपंग झाले
अशांच्या कुटुंबियांना चरितार्थ चालविण्यासाठी;
लघुद्योग, कुटीरोद्योग अगर एखादा
छोटासा व्यापार सुरु करण्यास बँक कर्ज देईल.

अधिक तपशीलासाठी संपर्क साधा.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना-१९३६ ● मुख्य कचेरी-चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा ● शेडयुल्ड बँक

BANK TO BANK...

# THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth,**

**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT,**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR,**
*Chairman.*




**GADRE BROTHERS**

**ENGINEERS & FOUNDERS**

**MADHAVNAGAR (S. Rly.)**

**Phone : 318**
**Sangli**

**Gram : 'SEWA**
**Madhavnagar**




# पाणी....पाणी

## हवं तेव्हा, हवं तितकं

शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.

**त्या साठी भरवश्याचं असं 'एकच'**

# किर्लोस्कर एंजिन

३ ते १५ हार्स पॉवर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड.

रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सेनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

४२ विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३२७२ कारखाना : ३५५१०१

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)